फौ.अर्ज.क. ४९८/२०१८
नि.क.९

**साक्षीदाराचा पुढील सरतपास अर्जदारातर्फे त्यांचे वकील श्रीमती भिमा गेडाम(बोरकर) यांद्वारे शपथेवर सुरु.**

आता मला नि.३ वरिल यादीनुसार दस्त क. १ वरिल माझे आधार कार्ड दाखविण्यात आले. ते सत्यापित प्रत असुन त्यास **नि.क.१२** देण्यात येते. आता मला नि.३ वरिल यादीनुसार दस्त क.२ दाखविण्यात आले. ते माझे निकाह नाम्याची छायांकित प्रत आहे. मी सदर निकाह नाम्याची मुळ प्रत सोबत आणली आहे. ती तिच असुन छायांकित प्रतीला **नि.क.१३** देण्यात येते. आता मला यादी नि.क.१५ वरिल दस्त क.१ दाखविण्यात आले. ते मला लग्नात दिलेल्या दहेज वस्तुच्या यादीचे रजिस्टर आहे. ते उर्दु या भाषेत असुन त्यावर माझी सही आहे. सदर यादीचे मी भाषांतर केलेली यादी नि.३ वरील दस्त क.३ वर दाखल केलेली आहे. सदर रजिष्टरला **नि.क.१६** देण्यात येते.

**उलटतपास गैरअर्जदाराकरीता त्यांचे श्री. ए.आर.शर्मा याद्वारे-**
तोंडी विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्विकृत                                        समक्ष

दि.न्या.क.स्तर,
कामठी.
दिनांक ९/०१/२०२०

(एस.एस.गाडवे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कोर्ट नं.२, कामठी.

फौजदारी अर्ज क्र. ४९८/२०१८
नि.क्र.९

**साक्षीदाराचा गैरअर्जदारातर्फे त्यांचे सुविद्य वकील श्री. ए.आर.शर्मा याद्वारे-**

माझे शिक्षण एम.एड. पर्यंत झाले आहे. मला इंग्लीश, हिंदी उर्दु लिहिता वाचता येते. मी शिक्षीका आहे. मी सन २०१४ पासुन शिक्षीका म्हणुन काम करत आहे. मी तीन वर्षानंतर सन २०१७ मध्ये कायम स्वरुपी झाले. मला २७,०००/- ते २८,०००/- पगार आहे. मी ९/०३/२०१७ पासुन गैरअर्जदारापासुन वेगळी राहत आहे. मला पहिल्यांदा तलाकनामा हा २१/०५/२०१७ रोजी मिळाला होता. दुसरा तलाकनामा हा मला जुन, २०१७ मध्ये मिळाला व तिसरा तलाकनामा हा मला नोव्हेंबर, २०१७ रोजी मिळाला. हे म्हणणे बरोबर नाही की २१ मे २०१७ रोजी माझा तलाक झाला होता. आता माझा तलाक झालेला आहे. हे म्हणणे बरोबर आहे की मी याआधी दिनांक ३०/०५/२०१७ मध्ये कौटुंबिक हिंसाचार कायदयाखाली अर्ज केला होता. सदर अर्ज हा प्रलंबित आहे. हे म्हणणे बरोबर आहे की मी आता दाखल केलेले कलम १९ कौटुंबिक हिंसाचार कायदा खाली अर्ज हा आधीच्या अर्जामध्ये देखिल केलेला आहे. माझा तलाक नोव्हेंबर २०१७ मध्ये झाला होता. मला इद्दतची रक्कम मिळाली आहे. मला तिस-या तलाकनाम्यासोबत म्हणजेच दिनांक १/११/२०१७ रोजी इद्दतची रक्कम मिळाली. हे म्हणणे बरोबर नाही की माझे तिस-या तलाकनाम्यात मी जातांना सर्व सामान घेवुन गेल्याबाबत नमुद आहे. हे म्हणणे बरोबर आहे की माझा अर्ज नि.१ वरिल wife of Salim हे चुकीचे लिहिलेले आहे व माझे शपथपत्र नि.९ मध्ये Divorcee of Salim हे बरोबर आहे.

प्रश्न- माझे तलाकनाम्यात मी सर्व सामान घेवुन गेल्याबाबत नमुद आहे. तुम्ही त्याबाबत कोणतीही तक्रार केली का ?
उत्तर मी माझे सामानाबाबत पोलीसांकडे तक्रार केली होती व महिला सेलकडे तक्रार केली होती.

मी सदर तक्रारेबाबत कोणतीही कागदपत्रे दाखल केलेली नाही. हे म्हणणे बरोबर आहे की मी दाखल केलेल्या नि.क.१६ वरिल रजिस्टर मध्ये ज्या लोकांनी मला भेटवस्तु व रोख रक्कम दिल्या त्यांच्या सहया नाहीत. हे म्हणणे बरोबर आहे की नि.क्र.१६ मधील रजिष्टरमध्ये जे काही इंग्रजी भाषेमध्ये लिहिले आहे ते मी लिहिले आहे. हे म्हणणे बरोबर आहे की नि.क्र.१६ मधील रजिष्टरमध्ये उर्दुमध्ये जे लिहिलेले आहे ते माझे बहिणीने लिहिलेले आहे. उर्दुमध्ये लिहिलेल्या मजकुरानंतर माझी सही आहे परंतु माझे बहिणीची सही त्यावर नाही आहे. हे म्हणणे बरोबर आहे की उर्दु भाषेतील यादीवरील मजकुरावर फक्त माझी सही आहे बाकी कोणाचीही सही नाही. हे म्हणणे बरोबर आहे की त्यावर गैरअर्जदार व त्याचे पालकांची देखिल सही नाही. हे म्हणणे बरोबर नाही की गैरअर्जदाराकडुन पैसे उकळण्यासाठी मी खोटे रजिस्टर तयार केले. हे म्हणणे बरोबर नाही की मी पहिला अर्ज प्रलंबित असतांना हा दुसरा अर्ज गैरअर्जदारांना त्रास देण्याकरीता दाखल केलेला आहे. हे म्हणणे बरोबर नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास -पुर्ण
फेरतपास- नाही.

श्रवणोत्तर स्विकृत समक्ष

दि.न्या.क.स्तर,
कामठी.
दिनांक १८/०१/२०२०

(एस.एस.गाडवे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कोर्ट नं.२, कामठी.